लोकमत

# वीजग्राहकांना मिळणार स्मार्ट मीटरिंग

■ लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : वीज कंपन्या वीजग्राहकांसाठी व्हिडीओ कॉंटॅक्ट सेंटर सुरू करत आहेत. याद्वारे ७ लाख स्मार्ट मीटर्सचे नियोजन करता येणार आहे. ग्राहकांसाठी लवकरच स्मार्ट मीटरिंग सोल्युशन मिळणार आहे. यामुळे ग्राहकांना आपल्या वीज वापरावर लक्ष ठेवणे शक्य होईल. त्यायोगे ते विजेवरील खर्च कमी करू शकतील.

वीजग्राहक सेल्फ मीटर रीडिंग, ईमेल व एसएमएसद्वारे बिले प्राप्त करणे, वेबसाइटवर किंवा ॲपवर बिले बघणे यांसारख्या अनेकविध सेवा डिजिटल पर्यायांचा वापर करून उपलब्ध करून घेऊ लागले आहेत, अशी माहिती अदानी इलेक्ट्रिसिटीने दिली. वीज कंपन्यांचा आभासी (व्हर्च्युअल) संपर्क केंद्रे स्थापन करण्यावर भर आहे. मोबाइल किऑस्क ही व्यवस्था सुरू केली, जेणेकरून ग्राहकांना बिल भरण्यासाठी कन्झ्युमर केअर सेंटरमध्ये जावे लागू नये.

Hello Mumbai
Page No. 1 Nov 25, 2020
Powered by: erelego.com